वर्ष : ०४ | अंक: २३ | मुंबई, मंगळवार १ मे २०१८ ते ७ मे २०१८ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 'आरे'त अतिक्रमणचा धोका?

3 → डिजिटल भारत व माहितीची सुरक्षितता

मनरेगाचा मोठा हलगर्जीपणा उघड ← 4




# मराठा आरक्षणासाठी कडवा संघर्ष



**मुंबई : मराठा समाजाने शांततेत ५८ मोर्चे काढले, तरी सरकार दखल घेणार नसेल, तर आता मराठा समाजाचीही सहनशीलता संपली आहे. त्यामुळे सरकारला कोणताही कालावधी न देता मराठा समाजाच्या आरक्षणासाठी कडवा संघर्ष करण्याचा, अचानक आंदोलन करण्याचा निर्धार मराठा क्रांती मोर्चाच्या बैठकीत एकमताने व्यक्त करण्यात आला. वंजारी व धनगर समाजाला जसे एका दिवसात आरक्षण दिले, त्याच धर्तीवर मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी विधिमंडळाचे एक दिवसाचे विशेष अधिवेशन घेण्याची मागणी करण्यात आली.**

सरकारशी यापुढे कोणतीही चर्चा करायची नाही, अशी भूमिकाही जाहीर करून सरकारने मराठा समाजासाठी जे सात जी. आर. काढल्याचा दावा केला, तो खोटा असल्याचे सांगून सरकारच्या निषेधाच्या घोषणा देत, हे जी.आर. फाडून टाकण्यात आले. तर मराठा चळवळीत फूट पाडण्याचे काम महसूलमंत्री चंद्रकांत पाटील हे करत असून, त्यांना उपसमितीतून हटविण्याची मागणी करण्यात आली. मराठा समाज आरक्षणासाठी पुढील दिशा ठरविण्यासाठी यशवंतराव चव्हाण सेंटर येथे मराठा क्रांती मोर्चाच्या बैठकीत हा निर्धार व्यक्त करण्यात आला.

### मराठा समाजाची सहनशीलता संपली

मराठा समाजाची सहनशीलता संपल्याचे सांगून आबासाहेब पाटील यांनी, महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांची जी उपसमिती आहे, त्यामध्ये केवळ चार-पाच जिल्ह्यांतील लोकांचा समावेश असून, मराठा समन्वयक या नावाने वावरणारे ते समाजाचे नेते नसल्याचे सांगितले.

### सरकारची इच्छाशक्ती नाही

मराठा समाजाला आरक्षण देण्याची सरकारची इच्छाशक्तीच नसल्याचा आरोप करून आबासाहेब पाटील यांनी, सरकारला केवळ सहा महिने झुलवत ठेवायचे असल्याचे सांगून, सरकारला ठोस भूमिका घेण्यास भाग पाडल्याशिवाय मराठा समाजाला आरक्षण मिळणार नसल्याचे स्पष्ट केले. सर्वेक्षणाच्या नावाखाली वेळ काढण्याचे काम सुरू असल्याचे सांगून पाटील यांनी, धनगर व वंजारी समाजाला ज्याप्रमाणे असल्या कोणत्याही सर्वेक्षणाशिवाय आरक्षण लागू करण्यात आले, त्याच धर्तीवर मराठा समाजालाही आरक्षण लागू करण्याची मागणी केली.

### उपसमितीने चळवळ फोडली

प्रा. माणिकराव शिंदे म्हणाले, आता सरकारलाही ताकद दाखविण्याची वेळ आली आहे. महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती स्थापन करण्यात आली, या समितीने चळवळ फोडण्याचेच पाप केले आहे. या चर्चेत सहभागी होणाऱ्यांपैकी काहींनी तुकडे गिळले आहेत.

महेश डोंगरे यांनी, 'खोटं बोल; पण रेटून बोल', असा कारभार सध्या सुरू असल्याचे सांगितले. बन्सी डोके यांनी वसतिगृह नसल्याने विद्यार्थ्यांना जो भत्ता दिला जातो, तो सरमहा ८३३ रुपये होतो, यामध्ये शहरात राहणे शक्य नसल्याचे सांगितले. संतोष सूर्यराव यांनी, राणे समितीच्या अहवालावर आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, आता वेळकाढूपणा चालू असल्याचा आरोप केला.

# 'नेहरुंवर टीका करणारे मोदी त्याच मार्गाने'



***मुंबई: 'पंडित नेहरू यांनी चीनशी मैत्री केली ती अंगलट आली. नेहरू यांच्यावर टीका करण्याची एकही संधी पंतप्रधान नरेंद्र मोदी सोडत नाहीत. मात्र नेहरू यांच्या 'पंचशील'च्याच मार्गाने मोदी चीनचा प्रश्न सोडवू पाहत आहेत,' असं सांगतानाच 'नेहरू हे 'पंचशील'चे उद्गाता होते. मोदी हे पंचसूत्राचे पाठीराखे बनले पण विचार नेहरुंचाच आहे. 'युद्ध नको तर बुद्धच हवा' हे नेहरूंप्रमाणे मोदी यांनाही पटले आहे असे दिसते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे यावर काय म्हणणे आहे?,' असा टोला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपला लगावला आहे.***

पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसाच्या चीन दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्याच्या निमित्ताने शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दैनिक 'सामना'च्या अग्रलेखातून मोदींवर तोंडसुख घेतले आहे. 'मोदी यांना चीनच्या सीमेवर शांतता हवी आहे. पुढील वर्षी देशात लोकसभा निवडणुका होणार आहेत. निदान निवडणूक काळात चीनने कटकटी वाढवू नयेत. एकदा निवडणूक होऊन जाऊ द्या, मग काय ते बघू अशी एकंदरीत मोदी यांची भूमिका दिसते,' अशी टीका उद्धव ठाकरे यांनी मोदींवर केली आहे.

मोदी हे चीन तसेच अन्य देशांची मुशाफिरी करून भारताच्या 'दौऱ्यावर' परतले आहेत. मोदी यांच्या चीन दौऱ्यातून नेमके हाती काय लागले यावर आता चर्चा सुरू आहे. विदेश मंत्रालयाचे असे म्हणणे आहे की, कोणत्याही विशेष 'अजेंड्या'शिवाय म्हणजे कामाशिवाय हा चीनचा दौरा होता. म्हणजे देशाचे पंतप्रधान हे बिनकामाचे आहेत व भरपूर मोकळा वेळ असल्याने ते सहज चीनला फेरफटका मारून आले. चीन मात्र पाकिस्तानला आजही मोठी मदत करीत आहे व भारताला अस्थिर करणे हाच त्यामागचा हेतू आहे. नेपाळ हे एकमेव हिंदूराष्ट्र चीनने गिळले आहे व चीनच्या प्रेरणेने नेपाळ भारताला दुश्मन मानू लागला आहे. बाजूच्या मालदीव, श्रीलंका, बांगलादेश व म्यानमारसारख्या राष्ट्रांतही चीनची घुसखोरी सुरू आहे. भूतानच्या सीमेवरील डोकलामला चिनी सैन्य जबरदस्तीने उभे करून भारताची डोकेदुखी वाढविण्याचे काम चीन करीत आहे, पण या एकाही विषयावर दोन देशांत चर्चा झाली नाही. अरुणाचलच्या सीमेवर भारताच्या हद्दीत चीनने बांधकामे सुरू केली आहेत. तिथून व उत्तराखंडात चिनी सैन्य नेहमीच घुसखोरी करीत असते.

# भाजपनं देशाच्या छातीत खंजीर खुपसला



**नवी दिल्ली: मध्यप्रदेशात नोकरभरती दरम्यान उमेदवारांच्या छातीवर त्यांच्या जातीचे नाव लिहिण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे अध्यक्ष राहुल गांधी यांनी भाजपवर जोरदार हल्ला चढवला आहे. 'भाजपने केवळ दलित उमेदवारांच्या छातीवर त्यांच्या जातीचं नाव लिहिलं नसून त्यांनी देशाच्या छातीत खंजीर खुपसला आहे,' अशी जोरदार टीका राहुल गांधी यांनी केली आहे.**

राहुल गांधी यांनी ट्विट करून भाजपवर ही टीका केली आहे. 'भाजपच्या जातीयवादी धोरणाने देशाच्या छातीत खंजीर खुपसला आहे. मध्यप्रदेशातील तरुणांच्या छातीवर एससी आणि एसटी लिहून देशाच्या संविधानावर हल्ला करण्यात आला आहे. ही भाजप आणि आरएसएसची विचारधारा आहे. त्यांच्या याच विचारधारेने एकेकाळी दलितांच्या गळ्यात मडकं, कंबरेला झाडू बांधला होता. भाजप आणि संघाच्या याच विचारधारेनं दलितांना मंदिर प्रवेश नाकारला होता, या विचारधारेलाच आम्ही पराभूत करणार आहोत,' असं ट्विट राहुल यांनी केलं आहे.

# अफगाणिस्तानात आत्मघाती हल्ल्यात ११ चिमुरड्यांचा मृत्यू



**अफगाणिस्तानात परदेशी ताफ्यावर आत्मघाती हल्ला करण्यात आला असून यामध्ये ११ मुलांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. कंदहार येथे हा हल्ला झाला आहे. अफगाणिस्तानात परदेशी लष्कर ताफ्यावर आत्मघाती हल्ला करण्यात आला असून यामध्ये ११ मुलांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. कंदहार येथे हा हल्ला झाला आहे. स्फोट झाला तेव्हा ही मुलं जवळच उभी होती. एका कारमध्ये हा शक्तिशाली स्फोट झाला. या स्फोटात जवळपास १६ जण जखमी झाले आहेत.**

याआधी अफगाणिस्तानची राजधानी काबूल शहर सोमवारी सकाळी सलग दोन स्फोटांनी हादरले. या स्फोटात २५ जण ठार तर ४५ हून अधिक लोक जखमी झाल्याचे वृत्त आहे. पहिला स्फोट शशदारक परिसरात झाला. त्यानंतर दुसरा स्फोट हा त्याच परिसरातील एनडीएस गुप्तचर कार्यालयाजवळ झाला. या स्फोटात एएफपी या वृत्तसंस्थेचे छायाचित्रकार मराई शाह हे ठार झाले आहेत.

टोलो न्यूजने दिलेल्या वृत्तानुसार, दुसऱ्या स्फोटात अनेक पत्रकार जखमी झाल्याचे वृत्त आहे. हे सर्व पत्रकार स्फोटाचे वार्तांकन करण्यासाठी घटनास्थळी उपस्थित होते. सध्यातरी कोणत्याही दहशतवादी संघटनेने हल्ल्याची जबाबदारी घेतलेली नाही. काबूल पोलिसांचे प्रवक्ते दाऊद अमीन यांनी एएफपी या वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, हल्ल्यात मारले गेलेले आणि जखमी झालेले सर्वसामान्य नागरिक आहेत. गृह मंत्रालयाचे प्रवक्ते नजीब दानिश यांनी हल्ल्याला दुजोरा दिला आहे.

# धक्कादायक... सरकारी रूग्णालयात उंदराने रूग्णाचा डोळा कुरतडला






**मुंबई :** देशातील सरकारी रूग्णालयांची अवस्था कोणापासूनही लपलेली नाही. प्रशासनाच्या भोंगळ कारभारामुळे अनेकांनी जीव गमावले आहेत. मुंबईच्या बाळासाहेब ठाकरे ट्रामा केअर रूग्णालयात उंदरांनी एका रूग्णाचा डोळा कुरतडल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. उंदीर रूग्णाचा डोळा कुरतडत असताना प्रशासन मात्र झोपा काढत होते.

माझ्या मुलावर बाळासाहेब ठाकरे ट्रामा केअर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. दोन दिवसांपूर्वी त्याला आयसीयुमधून जनरल वॉर्डमध्ये दाखल करण्यात आले होते. पण, रात्रीच्या दरम्यान एका उंदराने त्याचा डोळा कुरतडला. सकाळी त्याच्या डोळ्याजवळून रक्त येत होते. त्याच्या शरीरावर आणि अंथरूणावर रक्ताचे डाग पडले होते, अशी माहिती तरूणाच्या वडीलांनी दिली.





## सौजन्य व्हॉट्सअप




# रेल्वे तिकिटांवर आता स्थानकांची नावे मराठीतही



**मुंबई :-** राज्यातील कोणत्याही रेल्वे स्थानकातून तिकीट काढल्यास तिकिटावर सुरुवातीच्या आणि शेवटच्या स्थानकांची नावे यापुढे मराठीतही छापली जाणार आहेत. यावर रेल्वेच्या क्रिसकडून (सेंटर फॉर रेल्वे इन्फॉर्मेशन सिस्टीम) काम सुरू असून १ मे या महाराष्ट्र दिनानिमित्त राज्यात त्याची अंमलबजावणी करण्याची योजना आहे. मात्र यात मराठी भाषेला हिंदी, इंग्रजीनंतर तिसरे स्थान देण्यात आले आहे. मुंबई उपनगरीय रेल्वेच्या तिकिटांवरही मराठीत स्थानकांची नावे छापण्यात येणार आहेत.

सध्या मुंबई उपनगरीय रेल्वेची तिकिटे आणि पासवर तसेच अनारक्षित गाड्यांच्या तिकिटांवर स्थानकांची नावे हिंदी, इंग्रजी भाषेतच असतात. स्थानिक भाषेला प्राधान्य देण्याचे धोरण केंद्र सरकारने आखले आहे. त्यानुसार रेल्वेत या धोरणाची अंमलबजावणी केली जात आहे. देशभरातील त्या त्या राज्यातील स्थानिक भाषेला प्राधान्य देत रेल्वे तिकिटांवर स्थानकांची नावे स्थानिक भाषेनुसारही छापण्यात येत आहेत. कर्नाटकात त्याची अंमलबजावणी केल्यानंतर आता महाराष्ट्रातही या नियमाची अंमलबजावणी केली जाणार आहे. सध्या स्थानकांची नावे ही तीन भाषांमध्ये आहेत. लोकल गाड्यांमधील उद्घोषणाही तीन भाषांतच होतात.

# धीम्या लोकलही आता १५ डब्यांच्या

**मुंबई -** पश्चिम रेल्वेवर अंधेरी ते विरारपर्यंत धीम्या मार्गावर १५ डब्यांच्या लोकल लवकरच सुरू होणार आहेत. यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची पूर्तता करण्यासाठी सुमारे ७० कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. त्यात प्लॅटफॉर्मची लांबी, सिग्नल यंत्रणेत बदल, वळणाकडील



रुळांना अन्यत्र नेणे आदी कामांचा समावेश आहे. या कामांसाठी सुमारे दीड ते दोन वर्षांचा कालावधी अपेक्षित आहे.

अंधेरी ते विरार आणि त्यापुढील मार्गांवर उपनगरीय प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्याअनुषंगाने पश्चिम रेल्वेने अंधेरी ते विरारपर्यंत १५ डब्यांच्या लोकलचा विस्तार धीम्या मार्गावरही करण्याचा निर्णय घेतला. त्याची अमलबजावणी करताना तांत्रिक समस्या, अडचणींचा आढावा घेऊन नियोजन केले आहे.

पश्चिम रेल्वेवर अंधेरी ते विरारपर्यंत धीम्या मार्गावर १५ डब्यांच्या लोकल चालवता याव्यात यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची पूर्तता करण्यासाठी सुमारे ७० कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. या कामांसाठी सुमारे दीड ते दोन वर्षांचा कालावधी अपेक्षित आहे.

१५ डब्यांच्या लोकलचा विस्तार धीम्या मार्गावरही करताना त्यातील तांत्रिक समस्या, अडचणींचा आढावा घेऊन त्याप्रमाणे नियोजन केले आहे. त्यात सर्वाधिक प्राधान्य पायाभूत सुविधांना देण्यात आले आहे. यासाठी अतिरिक्त डब्यांचीही आवश्यकता असून त्यासाठी स्वतंत्र तरतूद केली जाणार आहे. अंधेरी ते विरारपर्यंत धीम्या मार्गावर अशा लोकल चालवण्यासाठी प्लॅटफॉर्मची लांबी वाढवणे हे मोठे आव्हान आहे. या साऱ्या तांत्रिक गोष्टींसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून लवकरच ही कामे सुरू होण्याची अपेक्षा आहे. त्यासाठी सुमारे ७० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. मात्र, अतिरिक्त डब्यांच्या खरेदीसाठी वेगळा खर्च होणार आहे.

प्लॅटफॉर्मची लांबी वाढवण्याच्या जोडीलाच सिग्नल यंत्रणेत आवश्यक बदल करण्याचाही भाग महत्त्वाचा ठरणार आहे. प्लॅटफॉर्मच्या एका टोकापासून ते दुसऱ्या टोकापर्यंत असणाऱ्या सिग्नल यंत्रणेत प्लॅटफॉर्मच्या लांबीनुरूप बदल करावे लागतील. ते करतानाच वळणाच्या ठिकाणी असणाऱ्या रुळांचीही जागा बदलावी लागणार आहे. ही कामे पूर्ण झाली की धीम्या मार्गावरही १५ डब्यांची लोकल धावेल, असा विश्वास पश्चिम रेल्वेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक मुकुल जैन यांनी व्यक्त केला.

# 'आरे'त अतिक्रमणचा धोका?

**मुंबई - मुंबईचा विकास आराखड्यात नैसर्गिक क्षेत्रांना संरक्षण देण्याचा मुद्दा आहे. आरेची जागासुद्धा हरितपट्ट्यामध्ये समाविष्ट आहे. अशा वेळी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील लोकांचे आरेमध्ये पुनर्वसन करताना या ठिकाणी अतिक्रमण होणार नाही, याची कोणती खात्री देण्यात येणार आहे, असा प्रश्न पर्यावरणवाद्यांकडून विचारला जात आहे. राष्ट्रीय उद्यानासारख्या संरक्षित ठिकाणीही अतिक्रमण रोखणारी यंत्रणा आपल्याकडे नाही. त्यामुळे आरेच्या हरित पट्ट्यामध्ये अतिक्रमण होणार नाही ही खात्री देता येईल का, अशी शंका उपस्थित होते.**

महाराष्ट्र निसर्ग उद्यानाचे आर्किटेक्ट उल्हास राणे यांनीही आराखड्यामध्ये नैसर्गिक क्षेत्र आणि मोकळ्या जागांसाठी नव्या कोणत्या योजना आखली आहेत त्याची आकडेवारी जाहीर होण्याची गरज व्यक्त केली. नव्या आराखड्यामध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाभोवती बफर म्हणून पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्राची



आखणी करणे अपेक्षित होते. याची निर्मिती करण्यात आली आहे का? मुंबईत इतर ठिकाणी हरितपट्ट्यांची योजना आखली आहे का? असे त्यांनी यानिमित्ताने विचारले आहे.

मुंबईतील मोकळ्या जागा खरोखरच वाढवल्या असतील तरच हा विकास आराखडा पर्यावरणस्नेही म्हणता येईल, असे राणे यांनी सांगितले. एफएसआय वाढवताना हरितपट्टेही त्या प्रमाणात वाढवणे अपेक्षित आहे. मोकळ्या जागा, हरितपट्टे वाढले नाहीत तर मुंबईकरांना वाढत्या प्रदूषणाचा सामना करावा लागणार आहे. या दृष्टीने केवळ नैसर्गिक क्षेत्रांची आणि मोकळ्या जागांची कागदावरील आकडेवारी दाखवताना विचार गरजेचे आहे, असे पर्यावरण अभ्यासकांचे म्हणणे आहे.

परप्रांतीय लोंढे सामावून घेण्यास जागा नको? फ्लॅट मधून बाहेर पडून तूम्ही मतदान करत नाही. तेव्हा हेच लोक कामी येतात मग त्यांच्या साठी आरक्षण का नको?व्होट बँक तयार कशी होणार २०१९ जवळ येतय. भाजपा चा कारभार पाहून लोकल लोकं मत देणार नाहीत!!

मोकळ्या जागांच्या मुद्द्याबाबत अर्बन डिझाईन रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक पंकज जोशी यांनी, 'मुंबईच्या विकास आराखड्यातील मोकळ्या जागा सामान्यांना उपलब्ध आहेत का', असा मुलभूत मुद्दा मांडला आहे. आकडेवारीमध्ये सकारात्मक चित्र दिसत असले तरी यातील किती जागांवर मुले खेळू शकतील, किती जागा लोकांना मोकळा श्वास घ्यायला उपलब्ध होतील, किती ठिकाणी सामान्य नागरिक जाऊ शकतील आणि किती जागा खासगी कुबच्या आहेत याचा विचार करून ही आकडेवारी समजून घेणे आणि विश्लेषण करणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. कागदावरील योजना प्रत्यक्षात जेव्हा येतील आणि त्यांची सुयोग्य अंमलबजावणी होईल तेव्हाच हा आराखडा पर्यावरणस्नेही म्हणता येईल, असे यानिमित्ताने सांगण्यात येत आहे.

# मुंबईत सहा शाळांचा आडमुठेपणा



***मुंबई : मुंबईत सुरू असलेल्या आरटीई प्रवेशप्रक्रियेत सहा शाळांच्या आठमुठेपणामुळे हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य अडचणीत आले आहे. या शाळांच्या आडमुठ्या धोरणामुळे ही प्रवेशप्रक्रिया लांबली असून जर विद्यार्थ्यांना या प्रक्रियेत प्रवेश मिळाला नाही तर मुलांना इतर शाळांमध्येही प्रवेश घेण्याची सोय राहणार नाही. यामुळे ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण व्हावी, अशी मागणी होत आहे.***

आरटीई प्रवेशानंतर संबंधित विद्यार्थ्यांचे शुल्क सरकारकडून दिले जाते. या शुल्काची प्रतिपूर्ती न झाल्यामुळे खासगी शाळांनी प्रवेश देणे बंद केले होते. दरम्यान, महापालिका शिक्षण विभागाने दहा दिवसांपूर्वी महापालिकेच्या अखत्यारीतील सुमारे ३०० प्राथमिक शाळांना ६ कोटी ३६ लाख रुपयांच्या शुल्काची प्रतिपूर्ती केली. यामुळे या प्रवेशप्रक्रियेतील अडथळा दूर होईल, अशी अपेक्षा व्यक्त होती. मात्र सहा शाळांच्या खात्यात काही तांत्रिक कारणामुळे पैसे जमा झाले नाहीत. ते जमा झाल्यावरच आम्ही प्रवेश देऊ, अशी भूमिका या शाळांनी घेतल्याने प्रवेशाची मुदत संपल्यानंतरही विद्यार्थ्यांना काही शाळांमध्ये प्रवेश मिळू शकलेला नाही. मुंबईत आरटीई प्रवेशाच्या पहिल्या फेरीत ३२३९ विद्यार्थ्यांची शाळानिहाय यादी जाहीर करण्यात आली होती. मात्र त्यापैकी अवघ्या २०१९ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले आहेत. शाळांनी पहिल्या फेरीतील रिक्त जागांचा तपशीलही शिक्षणाधिकारी कार्यालयाला कळविलेला नाही. यामुळे पहिल्या फेरीची प्रक्रियाच अद्याप पूर्ण होऊ शकलेली नाही. परिणामी प्रवेशाची दुसरी सोडत लांबणीवर पडली आहे. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर होणार आहे. जर ही प्रक्रिया लांबत गेली आणि काही मुलांना प्रवेश मिळाला नाही तर इतर शाळांमध्ये प्रवेश घेण्याचे पर्यायही बंद होतील, अशी भीती व्यक्त होत आहे.

# प्रमाणपत्र रोखल्यामुळे विद्यार्थ्यांच्या नोकऱ्या अडचणीत

**मुंबई -** कामा व ऑलब्लेस रुग्णालय प्रशासनाच्या मनमानी कारभारामुळे रेडिएशन तंत्रज्ञ पदवीचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना बाहेर नोकऱ्या करण्यासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र रुग्णालय प्रशासन देत नसल्याने विद्यार्थ्यांना अडचणी सहन कराव्या लागत आहेत. विद्यार्थी हतबल झाले असून यासाठी आता ते मुख्यमंत्र्यांकडे दाद मागणार आहेत.



कामा रुग्णालयात आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या पदवीचा रेडिओ थेरेपी टेक्निशियन हा अभ्यासक्रम शिकवला जातो. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना कामा रुग्णालयातून एक प्रमाणपत्र दिले जाते. त्याच्या आधारे डॉ. होमी भाभा ॲटोमिक रिचर्स सेंटरकडून या विद्यार्थ्यांना रेडिशनचे ऑनलाइन नोंदणी करून एक प्रमाणपत्र दिले जाते, त्यानंतरच हे विद्यार्थी रेडिएशनच्या नोकरीसाठी पात्र ठरतात. मात्र कामामाध्ये हा अभ्यासक्रम २०१३ ते २०१६ या कालावधीत पूर्ण केलेल्या श्रीकांत पोळ याला कामामधून आवश्यक असलेले प्रमाणपत्र न मिळाल्याने नोकरी गमवावी लागली आहे. तर त्यांच्यासोबतच प्राची साळगावकर, हेमांगी कांबळे, रेणुका प्रसाद आदी विद्यार्थिनींना केवळ कामामधून प्रमाणपत्र न मिळाल्याने नोकरीसाठी वणवण भटकावे लागत आहे.

कामा रुग्णालयाच्या अधीक्षिका डॉ. राजश्री कटके या स्त्रीरोग तज्ज्ञ असल्याने त्या हे प्रमाणप्रत्र देऊ शकत नाहीत. विद्यार्थी ज्या विभागात होते. तेथील प्राध्यापक ते देऊ शकतात, असे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# रिलायन्स जिओमध्ये 'मेगा'भरती; ८० हजार जणांना मिळणार नोकऱ्या

**मुंबईः** चालू आर्थिक वर्षात रिलायन्स जिओकडून ७५ ते ८० हजार कर्मचाऱ्यांची भरती केली जाणार आहे. सध्या रिलायन्स जिओच्या कर्मचाऱ्यांची संख्या १ लाख ५७ हजार इतकी आहे. लवकरच यामध्ये ७५ ते ८० हजार कर्मचाऱ्यांची भर पडेल, अशी माहिती कंपनीच्या ह्युमन रिसोर्स विभागाचे प्रमुख संजय जोग यांनी एका कार्यक्रमानंतर बोलताना दिली.

सध्या सुरू असलेल्या आर्थिक वर्षात रिलायन्स जिओकडून कर्मचाऱ्यांची संख्या वाढवली जाणार का, असा प्रश्न संजय जोग यांना विचारण्यात आला होता. या प्रश्नाला जोग यांना होकारार्थी उत्तर दिलं. कंपनीनं देशभरातील सहा हजार महाविद्यालयांशी करार केला असल्याचंही त्यांनी सांगितलं. यामध्ये तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचाही समावेश असल्याची माहिती त्यांनी दिली. या संस्थांमधील काही अभ्यासक्रम रिलायन्स जिओच्या दृष्टीनं महत्त्वाचे आहेत. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेले उमेदवार रिलायन्स जिओमध्ये काम करण्यासाठी अगदी योग्य ठरतील, असं जोग यांनी सांगितलं. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही भरती करण्यात येईल, अशी माहितीदेखील जोग यांनी दिली.

# पोलिसांच्या 'यंग ब्रिगेड'मुळे झाला नक्षलींचा बीमोड



**मुंबई :** नक्षलग्रस्त गडचिरोलीत कार्यरत असलेल्या पोलीस दलातील उच्चशिक्षित अधिकाऱ्यांच्या 'यंग ब्रिगेड'मुळे नक्षलवाद्यांचा खात्मा होत असून या भागातील नक्षली चळवळ नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. महिला पोलीस अधिकारीसुद्धा एके-४७ हाती घेऊन जंगलात नक्षल्यांचा खात्मा करीत आहेत.


आजवर गडचिरोलीतील नियुक्ती ही काळ्यापाण्याची शिक्षा समजली जायची. परंतु सरकारने गडचिरोलीत तीन वर्षे सेवा दिलेल्यांना पसंतीच्या ठिकाणी नियुक्ती देण्याचे धोरण आखल्याने येथे नियुक्ती मिळालेले अधिकारी आनंदाने कार्यकाळ पूर्ण करत आहेत. तर २५ टक्के अधिकारी 'मिशन' म्हणून स्वत:हून गडचिरोलीत येण्यास उत्सुक असतात. गेल्या पाच वर्षांत शंभरपेक्षा अधिक नक्षलवादी मारले गेले तर ६५० पेक्षा अधिक शरण आले आहेत.

नुकत्याच राबविलेल्या दोन मोहिमांमध्ये तब्बल ३७ नक्षलवादी मारले गेले. एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात यश मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे. नक्षल चळवळीतील 'बॉस'चे वय ६० वर्षांपेक्षा अधिक असून त्याला विविध आजारांनी ग्रासले आहे. नक्षलींच्या १४ सदस्यीय कोअर कमिटीमध्ये केवळ दोनच सदस्य तरुण आहेत. तर पोलीस अधिकाड्ढयांचे वय सरासरी २५ वर्षे आहे. त्यामुळे विचार क्षमता, गतिमानता यात पोलीस सरस ठरत आहेत.

२ गत आठवड्यातील मोहिमेत नक्षल्यांचे चार प्रमुख नेते मारले गेले. या चकमकीत नक्षलींची दोन दलम व एक प्लाटून पूर्णता संपली. नेतृत्वाची फळीच गारद झाल्याने नक्षलवादी हादरले आहेत.

# अवैध वाढवलेले फ्लॅट्सही आता नियमित होणार!

**मुंबई –** शासकीय, पालिका नियमांनुसार व्यापारी जागा, फ्लॅटच्या गॅलरी, डक्ट, कोनाड्यांसाठी सोडलेल्या जागा आत घेऊन आपला फ्लॅट, व्यावसायिक जागा वाढवणारे जागामालक, तसेच इमारतीवर अवैधरित्या वाढविण्यात आलेल्या मजल्यांवर राहणाऱ्या रहिवाशांसाठी आता एक खूषखबर आहे. निश्चित केलेला प्रिमियम भरल्यानंतर सदर जागा तसेच मजले नियमित करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला असून अशा हजारो फ्लॅटधारकांना त्यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.



अतिक्रमण केल्याचा ठपका ठेवून अशा जागांवर दुप्पट टॅक्स, किंवा दंडाची रक्कम आकारण्यात येत होती. त्याचा मोठा भुर्दंड प्लॅटधारक किंवा व्यावसायिकास बसत होता. त्यामधूनही त्यांची सुटका होणार आहे. महापालिकेने घेतलेल्या नवीन निर्णयाने अवैध मजल्यांवर राहणाऱ्या रहिवाशांची घरेही आता नियमित होणार असल्याने लाखो कुटुंबावर फ्लॅट तोडण्याची असलेली टांगती तलवार दूर होणार असल्याने नागरिकांनी सुटकेचा निःस्वास सोडला आहे.

मुंबईमध्ये जागांची मोठी कमतरता आहे. त्यातच कुटुंबातील सदस्यांच्या संख्येचा विचार करता अनेक कुटुंबांना आहे ती जागाही कमी पडते. साहजिकच ते फ्लॅटबाहेर सोडलेल्या डक्ट, गॅलरी, कोनाड्यांच्या जागा आपल्या फ्लॅटमध्ये आत घेतात. अशा घटना निदर्शनास आल्यानंतर त्यातून भ्रष्टाचारालाही प्रोत्साहन मिळत होते. साहजिकच हा प्रश्न महापालिका, सरकारची मोठी डोकेदुखी ठरली होती. मात्र, आता निश्चित करण्यात आलेला प्रिमियम भरल्यानंतर या जागा नियमित करण्यात येणार आहेत. बिल्डरांनी नियमानुसार बांधण्यात येणाऱ्या अनेक इमारतींवर अवैध मजले बांधले होते.

असे फ्लॅट खरेदी करणारांना त्याची कल्पना नसल्याने असे फ्लॅट कधीही पाडले जाऊ शकतात, या भीतीने असंख्य कुटुंबे संकटात होती. मात्र, असे मजलेही ठराविक प्रिमियम भरल्यानंतर नियमित करण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे अवैधरित्या वाढीव फ्लॅट, व्यापारी जागा तसेच अवैध मजल्यांवर राहणाऱ्या रहिवाशांना दुप्पट कर भरावे लागत होते. मात्र, महापालिकेच्या निर्णयानुसार आता त्यामधून त्यांची सुटका होणार असून त्यांच्या जागा नियमित होणार आहेत. मुंबईचा नवा डीपी हा मुंबईकरांचा कमी आणि बिल्डरांचा अधिक असा सूर आता उमटू लागला असून, मुंबईत यापुढे टॉवर संस्कृती अधिक फोफावेल आणि ओघानेच गर्दी वाढेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# एअरपोर्ट फनेल विभागातील रहिवाशांना अखेर दिलासा!



सांताक्रूझ विमानतळामुळे बाधित होणाऱ्या (एअरपोर्ट फनेल) ४० ते ५० वर्षे जुन्या चाळी आणि इमारतींच्या पुनर्विकासासाठी नवी विकास नियंत्रण नियमावली आणण्यात येणार आहे. नव्या विकास आराखड्यात तशी तरतूद करण्यात आली आहे. याबाबतचा तपशील हाती आलेला नसला तरी या इमारतींचा आहे त्याच ठिकाणी पुनर्विकास आणि त्यातून निर्माण होणारा विकास हक्क हस्तांतर (टीडीआर) खुल्या बाजारात विकण्याची परवानगी आदींचा नव्या विकास नियंत्रण नियमावलीत उल्लेख असेल, असे कळते. त्यामुळे अशा सहा हजार इमारतींमधील सुमारे साडेतीन लाख रहिवाशांना फायदा होणार आहे. प्रस्तावित विकास आराखड्यात हा परिसर 'एअरपोर्ट फनेलबाधित' म्हणून घोषित केला जाणार आहे.

सांताक्रूझ पूर्व-पश्चिम, विलेपार्ले पूर्व-पश्चिम, कुर्ला, घाटकोपर या उपनगरातील इमारतींना सांताक्रूझ आणि पवनहंस या विमानतळांचे फनेल झोन (विमानाचे उड्डाण आणि उतरण्याच्या मार्गावरील परिसर) लागू आहेत. या फनेलमध्ये येणाऱ्या इमारतींच्या उंचीसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियम लागू आहेत. दोन ते तीन मजल्यांपर्यंतच उंचीची मर्यादा असल्यामुळे या इमारतींना लागू करण्यात आलेल्या एक चटई क्षेत्रफळात या इमारतींचा पुनर्विकास होणे अशक्य आहे. या इमारती जीर्ण झाल्या असून काही मोडकळीसही आल्या आहेत. स्वखर्चाने इमारतींचा पुनर्विकास करण्याची ऐपत नाही, अशा स्थितीत हे रहिवासी भरडले गेले होते. त्यांना या निर्णयाने दिलासा मिळणार आहे. अत्यंत कमी उंचीवरून उडणाऱ्या विमानांच्या आवाजामुळे होणारे ध्वनिप्रदूषण, दररोज साडेसातशेहून अधिक विमानांची उड्डाणे, त्यामुळे रात्रीची झोपमोड, महाकाय विमानांच्या उड्डाणामुळे होणारे इमारतींचे कंपन आणि त्यामुळे कमकुवतपणा लक्षात घेतला तर दुर्घटना होण्याची शक्यता आहे. २०३४ च्या आराखड्यात याबाबत विचार व्हावा, असा आग्रह होता.

# मुंबईकरांच्या सेवेत 'सेमी वातानुकूलित' लोकल लवकरच!

**मुंबई :** मुंबईकरांच्या आरामदायी प्रवासासाठी रेल्वे बोर्डाने 'सेमी वातानुकूलित' लोकलच्या प्रस्तावावर निविदा प्रक्रियेला सुरुवात केली आहे. ६ वातानुकूलित बोगी आणि ६ सामान्य बोगी या मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या 'सेमी वातानुकूलित' लोकलच्या प्रस्तावाला रेल्वे बोर्डाने हिरवा कंदील दाखवला आहे. 'मे' महिन्यात सेमी वातानुकूलित लोकलच्या निविदा जाहीर करण्यासाठी बोर्डाने हालचाली सुरू केल्या आहेत.



वातानुकूलित लोकलमुळे पश्चिम रेल्वेवरील प्रवाशांचे आरामदायी प्रवासाचे स्वप्न पूर्ण झाले. मात्र वातानुकूलित लोकलमुळे अन्य लोकल फेऱ्यांवर गर्दीचा ताण येत असल्याचे स्पष्ट झाले. यामुळे मुंबई रेल्वे विकास महामंडळाने पश्चिम रेल्वे मार्गावर सेमी वातानुकूलित लोकलचा प्रस्ताव बोर्डाकडे पाठवला होता.

रेल्वे बोर्डातील अधिकाड्ढयांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, प्रस्ताव बोर्डात दाखल झाल्यानंतर वातानुकूलित तीन बोगी की सहा बोगी करणे योग्य ठरेल, यावर चर्चा झाली. चर्चेअंती ६ बोगी वातानुकूलित आणि ६ सर्वसामान्य बोगी या निर्णयापर्यंत पोहोचलो. रेल्वे बोर्ड आणि इंटिग्रल कोच फॅक्टरी (आयसीएफ) याबाबत निविदा जाहीर करेल. सध्या निविदा तयार करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून 'मे' महिन्यात निविदा प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

# मध्य रेल्वेच्या २२ रेल्वे स्थानकांवर अपंग प्रवाशांसाठी शौचालयसुद्धा नाही!

**मुंबई -** मुंबईतून भारतीय रेल विभागाला सर्वात जास्त महसूल मिळत असूनही मध्य रेल्वेचे २२ रेल्वे स्थानकांवर अपंग प्रवाशांसाठी शौचालयच नाही, अशी धक्कादायक माहिती आरटीआय कार्यकर्ते शकील अहमद शेख यांस मध्य रेल्वेने दिली आहे.

आरटीआय कार्यकर्ते शकील अहमद शेख यांनी मध्य रेल्वे कार्यालयकडे, मध्य रेल्वेची कोण-कोणते रेल्वे स्थाकांनवर महिला आणि दिव्यांग प्रवाशांसाठी शौचालय आहे? याबाबत माहिती विचारली होती. सदर माहिती संदर्भात मध्य रेल्वेचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, मध्य रेल्वेचे तब्बल ७६ स्थानकांपैकी २२ रेल्वे स्थानकांवर दिव्यांग प्रवाशांसाठी शौचालय नाही. तरी चिंचपोकळी, करी रोड, नाहूर, पलासधारी, केळावली, डोलावली, लोवजी, वाशी, सानपाडा, जुईनगर, नेरूळ, सीवूडस दरावे, बेलापूर, खारघर, मानसरोवर, खान्डेश्वर, रबाळे या रेल्वे स्थाकांनवर दिव्यांग प्रवाशांसाठी शौचालय नाही आहे. तसेच अटगांव रेल्वे स्थाकांनवर महिलांसाठी आतापर्यंत शौचालय नाही.

शकील अहमद शेख यांनी पीयूष गोयल व जनरल मैनेजर मध्ये रेल्वे यांस पत्र पाठवून सादर रेल्वे स्थानकांवर महिला आणि दिव्यांग प्रवाशांसाठी शौचालय निर्माण करण्याची मागणी केली आहे.



## संपादकीय...

# न्यायाचा इशारा!



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी जोधपूरच्या विशेष न्यायालयाने ठोठावलेल्या मरेपर्यंत जन्मठेपेच्या शिक्षेमुळे ढोंगी संत आसाराम बापूचा योग्य न्याय झाला आहे. हा धडा केवळ आसारामबापूसाठीच नसून धर्माच्या नावाखाली अनैतिक व्यवहार करणाऱ्या सगळ्यांनाच हा इशारा आहे. पैशाच्या, सत्तेच्या बळावर कायदा वाकवता येतो आणि गुन्हे करून नामानिराळे राहता येते असे अनेकांना वाटत असते. कोणत्याही सत्ताधारी आणि न्यायव्यवस्थेतल्या लोकांचे मधुर संबंध पाहून तर अनेकांची तशी ठाम समजूतही होत असते. परंतु घटनात्मक पदावरील सगळीच माणसे सत्ताधाऱ्यांच्या ओंजळीने पाणी पीत नाहीत आणि शेवटी कुणाही व्यक्तीपेक्षा कायदा श्रेष्ठ असतो, हे अशा निकालावरून स्पष्ट होते. अध्यात्मिक सत्ता, त्यातून निर्माण झालेली प्रचंड संपत्ती, अध्यात्माच्या नावाखाली नादी लावलेले हजारो अनुयायी आणि त्यांच्या बळावर सत्तेतील मंडळींशी केलेले साटेलोटे यामुळे गेल्या काही वर्षात देशभरात अशा भोंदूंचे प्रस्थ माजले आहे. अनुयायांना शांतीचा संदेश देणारे हे ढोंगी स्वतःवर प्रसंग आला, की भक्तांची ढाल करून युद्धासाठी मैदानात उतरत असल्याचे बाबा रामरहीम आणि रामपालच्या उदाहरणांवरून दिसून आले आहे. संताचा बुरखा पांघरलेली ही मंडळी अनेकदा थेट संघटित गुन्हेगारी क्षेत्रात उतरल्याचे चित्रही दिसते आणि आसारामबापूच्या कारवाया पाहता तो अशा सगळ्या भोंदूंचा शिरोमणी म्हणावा लागेल. अध्यात्माच्या नावाखाली दहा हजार कोटींची संपत्ती जमा केलेल्या आसारामने अनेक राजकीय नेत्यांनाही नादाला लावले होते, त्याचे व्हिडिओ समोर येत आहेत. सत्तेशी जवळीक हेच सूत्र असल्यामुळे त्यांना कुठल्या राजकीय पक्षाचे वावडे नसते, सगळेच सत्ताधारी त्यांना आपल्या पायाशी आणि पाठीशी हवे असतात. आसारामबापूवर आणखी एक बलात्काराचा आरोप असून तो खटला स्वतंत्रपणे सुरू आहे. आताचे प्रकरण अल्पवयीन मुलीवरील बलात्काराचे आहे. १५ ऑगस्ट २०१३ रोजी जोधपूरजवळच्या मनाई आश्रमात बलात्काराची घटना घडली होती आणि त्यासंदर्भातील तक्रार वीस ऑगस्टला दिल्लीत दाखल झाली होती. प्रकरण जोधपूरला पाठवल्यानंतर पोलिसांनी ३१ ऑगस्टला इंदूरमधून आसारामबापूला अटक केली होती. अटकेनंतर आसारामच्या अनुयायांनी देशभर अनेक ठिकाणी हिंसक निदर्शने केली. आसारामच्या सुटकेसाठी मोर्चे काढले, सोशल मीडियावरून मोहीम चालवली. पोलिसांवर आणि न्यायालयांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. २०१४मध्ये या प्रकरणाची न्यायालयात सुनावणी सुरू झाली, तेव्हापासून नऊ साक्षीदारांवर जीवघेणे हल्ले झाले असून त्यात तिघांचा मृत्यू झाला, तर एकजण बेपत्ता आहे. आसाराम आणि त्याचे समर्थक किती गुन्हेगारी वृत्तीचे आहेत, हेच यातून स्पष्ट होते. एवढे सगळे असूनही पीडित मुलगी आणि तिच्या कुटुंबीयांनी धीरोदात्तपणे परिस्थितीचा सामना केला आणि कोणत्याही दबावाला बळी न पडता शेवटपर्यंत खटला लढवला. जिथे साक्षीदारांचे जीव घेतले गेले तिथे तक्रारदारांच्या जिवाची किती जोखीम होती, हे लक्षात येऊ शकते. परंतु त्यांच्या निडरपणामुळेच एकोणीस देशांमध्ये आश्रम असलेल्या आणि चार कोटींहून अधिक अनुयायी असलेल्या आसारामसारख्या बड्या असामीला शिक्षा होऊ शकली. आपल्याकडील न्यायव्यवस्थेचा वर वर पाहता डोलारा कमकुवत बनत चालल्याचे चित्र कधी कधी दिसत असले, तरी पाया पक्का असल्यामुळेच अनेक गुन्हेगार शिक्षेपर्यंत पोहोचतात. हिट अँड रन प्रकरणात सलमान खानला किंवा गुजरात हिंसाचाराशी संबंधित नरोदा पाटिया नरसंहारात माया कोडनानीला खालच्या कोर्टांनी दीर्घकाळ सुनावणी करून शिक्षेपर्यंत नेले होते, ही त्याची उदाहरणे देता येतील. कायद्यातील फटींचा आधार घेऊन पुढच्या पायरीवर काही आरोपी निसटतात, परंतु अशा निकालांमुळे त्यांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीवर शिक्कामोर्तब होत असते. आसाराम प्रकरणात त्याची पुनरावृत्ती होणार नाही, अशी आशा बाळगता येते कारण संबंधित तक्रारदार मुलगी आणि तिच्या कुटुंबीयांनी आजवर प्रकरण निर्धाराने लढवले आहे, तोच निर्धार ते कायम ठेवतील. आसारामबापूला शिक्षा झाली आहे ती पार्श्वभूमीही विचारात घेण्याची गरज आहे. कथुआ, उन्नावसह देशभरात आणखी काही ठिकाणी बलात्काराच्या घटना घडल्या आणि त्या पार्श्वभूमीवर हा निकाल असल्यामुळे त्यासंदर्भात विशेष उत्सुकता होती. आसारामबापूला शिक्षा झाल्यामुळे त्यातून एक चांगला संदेश गेला आहे. बलात्कारासारख्या संवेदनशील घटनेनंतर अनुयायांनी अशा भोंदूचे शिष्यत्व झुगारून द्यायला हवे, परंतु मोठ्या प्रमाणावर अंधभक्त त्यांचे समर्थन करतात, हे आश्चर्यकारक आहे.

# डिजिटल भारत व माहितीची सुरक्षितता

**डिजिटल व्यवस्था वेगाने वाढत आहे. २१ व्या शतकातील मानवी जीवनाचा बोटांकन हा अविभाज्य, अपरिहार्य घटक बनत आहे. आधारकार्ड, करपत्रक, बँक खाती, भ्रमणध्वनी, प्रवेश परीक्षा, पासपोर्ट, परस्पर निधी, विमा, महसूल नोंदी, जन्म-मृत्यू नोंदी, खरेदी-विक्री नोंदी, रेशनकार्ड, भत्ता नोंदी, पेमेंट कार्ड, प्रवास नोंदी, शिक्षण नोंदी आदी अनेक स्वरूपात व्यक्तीच्या व्यक्तिगत वित्तीय, जैविक तथा शैक्षणिक नोंदीचे बोटांकीकरण होत चालले आहे. या सर्व गोष्टी आधारकार्डशी जोडण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे.**



अशा खासगी माहितीचा (Tjerbj) गैरवापर, चोरी किंवा अनधिकृत वापर व हस्तांतर होण्याची शक्यता मोठी आहे व ती वाढली आहे. एका २०१६ च्या वर्षात क्रेडिट/डेबिट कार्ड/रकमांची ३२ लाख प्रकरणांत चोरी झाल्याची अधिकृत माहिती आहे. साहजिकच, या सर्व प्रक्रियेत माहिती हस्तांतर प्रक्रियेतील खासगीपणा, गुप्तता या बाबींत व्यक्तीच्या दृष्टीने महत्त्वाची असणारी सुरक्षा व खासगीपणावर अतिक्रमण हे महत्त्वाचे सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्न होत आहेत. लोकशाही निवडणुकीत मतदारांचा कल विशिष्ट नेत्याकडे, राजकीय पक्षाकडे, विचार सरणीकडे वळविणे अशी माहिती साध्य करू शकणाऱ्या, त्यांचे विश्लेषण करू शकणाऱ्या केंब्रिज ॲनॅलिटिका तथा फेस बुकसारख्या जागतिक संस्थांच्या बाबतीत घडले हे आता सर्वज्ञात आहे.

सर्वोच्च न्यायालयाने या बाबतीत आस्ते कदम जात खासगीपणाचा हक्क मूलभूत हक्क मानणे योग्य ठरेल, अशी भूमिका घेतली आहे. व्यक्तिगत आवश्यक कागदपत्रे आधारकार्डशी जोडण्यासंबंधात मुदतवाढ मिळाली आहे. प्राईस वाटर-कूपर्स तसेच असोकॅमच्या मते माहिती सुरक्षा प्राप्त करण्यासाठी येणारा प्रतिव्यक्ती खर्च तसा नाममात्र असतो. १२ अंकांचे आधारकार्ड सुरक्षित करण्यासाठी १६ अंकांची आभासी सुरक्षा व्यवस्था करता येते, अशी भूमिका आधारच्या 'युडाई'ने घेतली आहे.

माहिती जितकी अधिक, तिची विद्युतक यांच्या आधारे नोंदणी जितकी अधिक, तितक्या अधिक प्रमाणात माहिती अधिकाधिक असुरक्षित होत जाते.

सध्या देशात ११९ कोटी लोक आहेत. त्यासाठी ११९ कोटी आधार कार्डे आहेत. ती वाढताहेत. वस्तू व सेवा कराखाली २०० लाख विक्रेत्यांची नोंद झाली आहे. प्रार्पतकर खात्याकडे ६०० लाख व्यक्तींची माहिती आहे. पासपोर्ट सेवा केंद्राकडे २५०० लाख नागरिकांची नोंद आहे. ई-गव्हर्नन्स खाली ७००० लाख अर्ज विविध दाखले, ओळखपत्रे, प्रमाणपत्रासाठी आले आहेत. इतक्या प्रचंड प्रमाणात संकलित होणारी ही माहिती डिजिटल पद्धतीने संगणक स्मृती व्यवस्थेत संचित होत आहे. संगणकाची तांत्रिक बैठक सर्वच संस्थांसाठी एकच असल्यामुळे त्यातून अंतर्गत व बाह्य गळती वा चोरी होण्याची प्रचंड मोठी शक्यता आहेच.

माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी नागरिकांनी पुढील प्रकारची काळजी व खबरदारी, सावधगिरी पाळण्याच्या सूचना सामान्यतः दिल्या जातात.

समान पासवर्ड वापरू नयेत, पासवर्ड लिहून देऊ नयेत, व्यक्तिगत माहिती मर्यादितच द्यावी, सार्वजनिक वाय-फायचा वापर टाळावा, सार्वजनिक प्रिंटरवर माहितीच्या कॉपीज काढू नयेत, बँक व्यवहार शक्यतो व्यक्तीशः करावेत.

या सर्व गोष्टी लक्षात घेता आधार कार्डाशी इतर सर्व माहिती व्यवहार सक्तीने संलग्न करणे निश्चितच धोक्याचे आहे.

विशेष म्हणजे, माहितीचा गैरवापर कोण, कसा, किती, केव्हा व कशासाठी करेल हे कळणे फार कठीण आहे. वेगवेगळ्या प्रशासकीय व्यवस्थेत अनेक प्रकारच्या प्रवृत्तीच्या व्यक्ती असतात. त्या केव्हा मोहाला बळी पडतील, हे स्पष्ट नसते. व्यवस्थेत सातत्याने व्यवस्थापकीय व तांत्रिक बदल होत असतात. साहजिकच, १०० टक्के माहिती सुरक्षा देण्याचे आश्वासन फारसे विश्वसनीय नाही, अशी १०० टक्के माहिती सुरक्षा कल्पनेचा खेळ मानावा लागेल.

सध्या खबरदारी म्हणून युडाई या संस्थेने १६ अंकांचा आभासी पासवर्ड वापरण्याची सोय केली आहे. सेक्युरिटीज एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाने सायबर सेक्युरिटी नेट व सायबर रेसिलिअन्स फ्रेम तयार केली आहे. बिगर वित्तीय संस्थांसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने आयटी फ्रेमवर्क केले आहे. तसेच बँकांसाठी सायबर सेक्युरिटी तयार केली आहे. भारतीय विमा नियामक मंडळाने विमा कंपन्यांसाठी सेक्युरिटी नोट तयार केली आहे. तसेच केंद्रीय वीज खात्याने कॉम्प्युटर इमरजन्सी रिस्पॉन्स टीम ४ ठिकाणी केली आहे.

एकंदरीत पाहता, माहितीची नोंदणी, वर्गीकरण, संरक्षण, हस्तांतर आदी बाबतीत संगणक क्षेत्रात ज्या वेगाने बदल होत चाललेत, ज्या वेगाने मानवी समाज संगणक व डिजिटलचा वाढता वापर करणार त्याच्याच अनेक पटींनी समाजातील विघातक घटक त्याच परक्यांच्या माहितीचा वापर स्वतःच्या फायद्यासाठी, इतरांच्या नुकसानीसाठी करण्याची प्रवृत्ती व प्रेरणा वाढतच जाणार. व्यक्तीच्या खासगी जीवनावर सार्वजनिक व छिद्रान्वेषी घटकाचे सतत वाढते लक्ष राहणार. एका अर्थाने हा व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच आहे. म्हणूनच माहितीच्या सुरक्षेचा विचार करताना व्यक्ती स्वातंत्र्य, खासगी मालमत्ता व खासगीपणा हे महत्त्वाचे निकष ठरतात. ज्या सामाजिक, तंत्र वैज्ञानिक बदलाने व्यक्ती स्वातंत्र्याचे आकुंचन होण्याची शक्यता असते, त्याच्या बाबतीत राज्य धोरणाचा निकष 'स्वातंत्र्याचे रक्षण' हाच एकमेव असू शकतो, असलाच पाहिजे.

# माओवाद्यांना संघटित उत्तर



माओवाद्यांच्या विरोधात गडचिरोली जिल्ह्यात सुरक्षा दलांनी मोठी कारवाई केली. या कारवाईमुळे माओवाद्यांच्या कारवायांना आळा बसेल, अशी आशा व्यक्त होत आहे. परंतु केवळ लष्करी कारवाईवर विसंबून न राहता सर्व आघाड्यांवर माओवाद्यांच्या विरोधातील लढाई लढावी लागणार आहे. याचे कारण मोठ्या प्रमाणावर हिंसाचार घडवून भारतीय राज्ययंत्र खिळखिळे करणे हा त्यांचा उद्देश आहे.

माओवाद्यांच्या विरोधात गडचिरोली जिल्ह्यात सुरक्षा दलांनी मोठी कारवाई केली. या कारवाईमुळे माओवाद्यांच्या कारवायांना आळा बसेल, अशी आशा व्यक्त होत आहे. परंतु केवळ लष्करी कारवाईवर विसंबून न राहता सर्व आघाड्यांवर माओवाद्यांच्या विरोधातील लढाई लढावी लागणार आहे. याचे कारण मोठ्या प्रमाणावर हिंसाचार घडवून भारतीय राज्ययंत्र खिळखिळे करणे हा त्यांचा उद्देश आहे.

त्यांच्या संघटनेचे तीन भाग आहेत. एक, माओवादी पक्ष (सी.पी.आय. माओवादी), दोन, माओवादी लष्कर (पीएलजीए) आणि तीन माओवादी फ्रंट संघटनांची संयुक्त आघाडी (युनायटेड फ्रंट). माओवादी पक्ष हा सर्वोच्च असून, त्याच्या आदेशाप्रमाणे माओवादी लष्कर आणि फ्रंट संघटना काम करतात. जंगल भागात बंदुका घेऊन फिरणारे माओवादी सैनिक आणि शहरी भागातून त्यांचे समर्थन करणारे फ्रंट संघटनांमधील विद्वान ही एकाच माओवादी पक्षाच्या हातातील दोन हत्यारे आहेत. माओवादी लष्कराने जंगलात हत्यासत्र चालवायचे आणि शहरातील माओवादी फ्रंट संघटनांनी पोलिस व सरकारी यंत्रणेच्या पाठीत खंजीर खुपसायचा, अशी त्यांची कार्यपद्धती आहे. माओवाद्यांच्या तात्त्विक गप्पा नेहमीच आकर्षक वाटतात; पण त्यांचे खरे रूप त्यांनी केलेल्या कृतीतूनच लक्षात येते. माओवाद्यांनी केलेल्या प्रत्यक्ष कृत्यांची थोडी माहिती खाली देत आहे. त्यावरूनच त्यांचे योग्य मूल्यमापन करता येईल. छत्तीसगड राज्यातील बिजापूर जिल्ह्यात पोलिस स्टेशन गंगालूरच्या हद्दीत तोळका हे एक खेडे आहे. या खेड्यात ताती आयतू हा आपल्या मुलाबाळांसह राहत होता. तातीला चार महिन्यांचा सोमरू नावाचा मुलगा होता.

माओवाद्यांनी गावाजवळ एक 'जन अदालत' आयोजित केली. गावागावांतील अनेक लोक तेथे उपस्थित होते. ताती आणि त्याच्या सर्व कुटुंबीयांना 'जन अदालत'समोर उभे करण्यात आले आणि कुठल्यातरी फुसक्या आरोपावरून सर्व गावकऱ्यांसमक्ष माओवाद्यांनी तातीला बेदम मारहाण करणे सुरू केली. आक्रोश करणाऱ्या त्याच्या पत्नी व बहिणीला न जुमानता तातीला मारणे सुरूच होते. 'जनअदालत'मध्ये मारहाण सुरू असताना एका गाफिल क्षणाचा फायदा घेऊन ताती आयतू माओवाद्यांच्या तावडीतून निसटला आणि जिवाच्या आकांताने जंगलात पळून गेला. सर्व जनतेसमोर ताती अशा रीतीने पळून गेल्यामुळे माओवाद्यांची फजिती झाली. संतापलेल्या माओवाद्यांनी तातीच्या पत्नीच्या कडेवर असलेल्या चार महिन्यांच्या सोमरूला हिसकले आणि रानटीपणाचा कळस म्हणजे लोखंडी सळाखींनी सोमरूला ठेचून ठार मारले आणि भयंकर आकांत करणाऱ्या त्याच्या आईचा डोळ्यांदेखत सोमरूच्या मृतदेहाला जमिनीत पुरले.

# एनएमएमटीची भाडेवाढ अटळ?

## ▌डिझेल दरवाढीच्या पार्श्वभूमीवर शक्यता;
## ▌महिन्याला सव्वातीन कोटी रुपयांचा तोटा

**नवी मुंबई :** नुकत्याच झालेल्या डिझेल दरवाढीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगैरपालिकेच्या परिवहन सेवेची (एनएमएमटी) तिकीट दरवाढ अटळ असल्याचे समजते. एनएमएमटीने चार महिन्यांपूर्वी १२ किलोमीटरपेक्षा दूरचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या तिकीट दरात एक रुपयाची वाढ केली होती, मात्र पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्याला त्या दरवाढीची झळ बसली नव्हती. एनएमएमटीच्या पहिल्या टप्प्यासाठी असणाऱ्या तिकीट दरात शेअर रिक्षासारखी खासगी प्रवासी वाहतूकही होत असल्याने एनएमएमटी प्रशासन या दरवाढीसंदर्भात संभ्रमात आहे.

देशात बंगळुरु येथील परिवहन सेवेव्यतिरिक्त कोणतीही सार्वजनिक परिवहन सेवा फायद्यात नाही. नवी मुंबईच्या जवळपासच्या पालिकांतील बेस्ट, एसटी, पीएमटी, टीएमटी या शहरी परिवहन सेवांचा तोटा दिवसेंदिवस वाढत आहे. नवी मुंबईतील एनएमएमटी सेवाही याच रांगेत आहे. सार्वजनिक सेवा असल्याने या उपक्रमाची दरवाढ करताना मोठ्या प्रमाणात विरोध होतो. तरीही एनएमएमटीने चार महिन्यांपूर्वी १२ किलोमीटरपेक्षा दूरचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी एक ते दोन रुपये दरवाढ केली. याच वेळी वातानुकूलित बसच्या तिकिटात २५ टक्के कपात करून मुंबईच्या दिशेचा थंडगार प्रवास स्वस्त करण्यात आला. वातानुकूलित बसचे तिकिट कमी करण्याची ही पाहिलीच वेळ होती. दरवाढ करण्यासाठीही नवी मुंबई परिवहन उपक्रमाला बरीच प्रतीक्षा करावी लागली होती.



काही दिवसांपूर्वी पेट्रोल-डिझेलच्या दरांत वाढ झाल्याने एनएमएमटीचा तोटा वाढू लागला आहे. उपक्रमात विविध मार्गावर धावणाऱ्या ३९० बसेस आहेत.

एनएमएमटीच्या अनेक बस नवी मुंबई वगळता मुंबई, पनवेल, ठाणे, उरण, कल्याण आणि डोंबिवली या आजूबाजूच्या शहरांना सेवा देतात. या ठिकाणांहून नवी मुंबईत कामानिमित्त येणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे ही सेवा देणे एनएमएमटीला आवश्यक आहे.

# खैरणेतील सहा कंपन्यांत भीषण आग

ठाणे-बेलापूर औद्योगिक वसाहतीतील खैरणे एमआयडीसीत सहा रासायनिक कंपन्यांमध्ये बुधवारी मध्यरात्री २.३० च्या सुमारास भीषण आग लागून त्या भस्मसात झाल्या. यात कंपन्याचे कोट्यवधींचे नुकसान झाले. तीन कर्मचारी गंभीर तर ४ कर्मचारी किरकोळ जखमी झाले. तब्बल १३ तासांनी आग आटोक्यात आणण्यात अग्निशमन दलाला यश प्राप्त झाले आहे.



आलमा या रासायनिक कंपनीला मध्यरात्री २.३०च्या सुमारास आग लागली. त्यानंतर ती आजूबाजूच्या इतर रासायनिक कंपन्यांत पसरली. वैष्णवी, आलमा, नाईक एन्व्हायर्नमेंट, नारलॅब, प्रोटॉन बायोकेमिकल, एक्सेल पेट्रोकेमिकल कंपन्या आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या. आलमा कंपनीत रिॲक्टरचा स्फोट झाल्याने आग लागली असा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे. यामध्ये नाईक एन्व्हायर्नमेंट कंपनीचा काही भाग वाचला असून इतर पाच कंपन्यांमधील सर्व साहित्य जळून राख झाले आहे. आगीमुळे कंपन्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. आलमाच्या तीन कर्मचाऱ्यांपैकी २ जण ९० टक्के तर एक जण ४० टक्के जखमी झाला. इतर चार कर्मचारी किरकोळ जखमी झाले आहेत. याप्रकरणी तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

आगीची लोट मोठ्या प्रमाणात पसरल्याने आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाला तारेवरची कसरत करावी लागली. रासायनिक कंपन्यांमध्ये आग लागल्याने आगीची तीव्रता अधिक होती. ती आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाला रबाळेव्यतिरिक्त नवी मुंबई शहराबाहेरच्या ठाणे, पनवेल अग्निशमन दलाच्या गाड्याही पाचारण कराव्या लागल्या. रबाळे एमआयडीसीमधील ४ बंब, तसेच ठाणे, ऐरोली, नेरुळ, खारघर, तळोजा, रिलायन्स, ओएनजीसी, एचपी येथून प्रत्येकी एक बंब असे सुमारे १५ बंब घटना स्थळी दाखल झाले होते. आग पूर्णतः विझवण्यासाठी १३ तास लागले. मध्यरात्री २.३० च्या सुमारास लागलेली आग दुपारी ३.३० वाजता पूर्णपणे आटोक्यात आली. आग आटोक्यात आल्यानंतरही सायंकाळी ५ पर्यंत पाण्याची फवारणी सुरूच होती.

# उरणमधील रस्त्यांवर मद्यपींचे अड्डे

उरणमध्ये सिडको तसेच इतर आस्थापनांच्या माध्यमातून रस्ते आणि उड्डाणपुलांचे जाळे उभारले जात असून कामे सुरू असलेल्या ठिकाणी मद्यपींचे अड्डे बनले आहेत. या ठिकाणी मद्यपी बाटल्या रित्या करून त्या तिथेच टाकून देतात. त्यामुळे पहाटे व्यायामासाठी येणाऱ्यांना याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. अशा प्रकारचे मद्यपींचे अड्डे उरण परिसरात वाढू लागले आहेत.

उरणच्या अनेक भागांत रस्त्यांचे काम वेगाने सुरू आहे. यातील अनेक रस्ते बांधून तयार आहेत, मात्र तिथे वाहतूक सुरू झालेली नाही. सध्या शाळेला सुटी असल्यामुळे अनेक पालक आपल्या मुलांना सायकल शिकविण्यासाठी आणि सकाळी व सायंकाळी चालण्यासाठी या रस्त्यांचा वापर करतात.

# भिवंडीत भाजपा नगरसेवक खंडणीखोरीने गोत्यात!

**भिवंडी :** भिवंडी शहरातील कामतघर येथील शामदनी हाईट्सच्या जागेवर जाऊन बिल्डर विकासकुमार गणपतलाल राठी यांस वारंवार मारहाण व शिवीगाळी करून २० लाखांची खंडणी उकळणाऱ्या तीन जणांविरोधात भिवंडीतील नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नगरसेवक तथा पालिकेतील भाजपा गटनेता निलेश चौधरी, प्रभाग समिती क्र. ३ चे सभापती हनुमान चौधरी, नगरसेविका योगिता पाटील यांचे पती महेश पाटील यांचा यामध्ये समावेश असून पोलिसांच्या या धाडसी कारवाईमुळे शहरातील राजकीय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे. ठाणे खंडणी पथकाचे पोलीस निरीक्षक प्रदिप शर्मा यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.



शहरातील कामतघर परिसरात अनेक विकासकामे सुरू आहेत. त्यापैकी शहरातील कासारआळी गोकुळनगर येथे राहणारे बिल्डर विकासकुमार राठी यांनी कामतघर परिसरात शामदनी हाईट्स या इमारतीचे बांधकाम केले आहे. हे काम सुरू ठेवण्यासाठी कामतघर भागातील स्थानिक नगरसेवक तथा भाजपा गटनेता निलेश चौधरी, प्रभाग समिती क्र. ३ चे सभापती हनुमान चौधरी तसेच महेश पाटील यांनी राठी यांच्याकडून ६० लाख रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी सन २०१२-१३ सालापासून त्यांनी २० लाख रुपये घेतले आणि उरलेल्या रक्कमेची मागणी करीत त्यांनी वेळोवेळी शिवीगाळी करून मारहाण केली.

तसेच इमारत बांधकाम व्यवसाय बंद पाडण्याची, कुटुंबीयांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली, अशी तक्रार बिल्डर विकासकुमार राठी यांनी ठाण्यातील खंडणीविरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक प्रदिप शर्मा यांच्याकडे केली. त्यानुसार नारपोली पोलीस ठाण्यात नगरसेवक निलेश चौधरी, हनुमान चौधरी व साथीदार महेश पाटील यांच्या विरोधात खंडणीचा गुन्हा दाखल केला आहे. परंतु या आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

# ठाण्यात बेकायदा मद्यवाहतूक

**ठाणे** - गाड्यांमधून दारूची बेकायदा वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध ठाणे ग्रामीण पोलिसांनी कारवाई करत देशी-विदेशी मद्याचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी एकूण ९ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

ठाणे ग्रामीण हद्दीतील अवैध दारूधंद्याविरोधात ग्रामीण पोलिसांनी जोरदार मोहीम उघडली आहे. २०१६ पासून विशेष पायलट प्रोजेक्टही राबवला जात असून अधीक्षक डॉ. महेश पाटील यांनी बेकायदा होणाऱ्या दारू वाहतूक तसेच विक्रीवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. दरम्यान, मोठ्या प्रमाणात मिरा-भाईंदर परिसरातील हॉटेल, लॉज, बार यांना विनापरवाना गाड्यातून दारूचा पुरवठा केला जातो, अशी माहिती भाईंदर विभागाचे सहाय्यक पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांना मिळाली होती. त्यानुसार पोलिस उपनिरीक्षक भालचीम, कस्तुरे आदींची चार वेगवेगळी पथके तयार करण्यात आली होती. या पथकासोबत इतरही कर्मचारी होते. बुधवारी या पथकांनी भाईंदर परिसरात छापे टाकत छोटे टेम्पो रिक्षा, एक मोटारसायकलसह ९ जणांना ताब्यात घेतले. यावेळी आरोपींकडे मिळालेल्या देशी-विदेशी मद्यसाठ्याबाबत चौकशी केली. तर आरोपींकडे कोणताही परवाना नव्हता. पोलिसांनी गाड्यांसह मद्यसाठा असा एकूण ७ लाख ३ हजार ६१ रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध नवघर, भाईंदर, नयानगर, मिरारोड पोलिस ठाण्यात दारूबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मनरेगाचा मोठा हलगर्जीपणा उघड

## ८९ लाख लोकांचा आधार नंबर सार्वजनिक

**नवी दिल्ली- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने(मनरेगा)तील मोठा घोळ समोर आला आहे. आंध्र प्रदेशातल्या मनरेगा योजनेत नोंद असलेल्या जवळपास ८९ लाख लोकांचा आधार डेटा आंध्र सरकारनं सार्वजनिक केला आहे. द हिंदूच्या रिपोर्टनुसार, गुरुवार( २६ एप्रिल) सकाळी हैदराबादेतल्या इंटरनेट सुरक्षा संशोधक कोडाली श्रीनिवास यांनी आधार नंबर लीक झाल्याची माहिती दिली. त्यानंतर लगेचच साइटवरून त्या नंबरांना ब्लर करण्यात आलं. आंध्र प्रदेशात बेनिफिट डिस्बर्समेंट पोर्टल(बीडीपी) मनरेगाशी संबंधित लोकांची मजुरी, सोशल सिक्युरिटीसह पेन्शनचा हिशेब ठेवते. राज्यातील ८९ लाख ३८ हजार १३८ लोकांनी स्वतःचा आधार नंबर या योजनेबरोबर जोडला आहे. या सर्व लोकांचे नाव, गावाचं नाव, जॉब कार्ड नंबर, आधार नंबर वेबसाइटवर टाकण्यात आले आहेत.**



जवळपास या योजनेत १ कोटी २ लाख लोकांनी सहभाग नोंदवला आहे. बेनिफिट डिस्बर्समेंट पोर्टल(बीडीपी) चे व्यवहार एपी ऑनलाइन सांभाळते. आंध्र प्रदेशमध्ये हे पहिल्यांदाच झालेलं नाही. कथित स्वरूपात हाऊसिंग कॉर्पोरेशनच्या लाभार्थ्यांचा आधार नंबर, त्यांच्या जातीची माहिती, बँक अकाऊंट आणि दुसरी माहिती सार्वजनिक करण्यात आली. याची माहिती कोडाली श्रीनिवास यांनी अधिका-यांना दिल्यानंतर वेबसाइटवरून आधार नंबर आणि व्यक्तिगत सूचना हटवण्यात आली आहे. जवळपास ४५ लाख लोकांचे बँक अकाऊंट नंबर, रेशन कार्ड नंबर, जाती आणि इतर माहितीही वेबसाइटवर उपलब्ध आहे.

द हिंदूच्या माहितीनुसार, कोडाली श्रीनिवास यांनी सांगितलं की, हे मूलभूत अधिकारांचं उल्लंघन आहे. राज्य सरकार पारदर्शकतेच्या नावावर लोकांची माहिती सार्वजनिक करते आहे. परंतु याचा दुरुपयोग राजकीय दल, व्यावसायिक संस्था आणि व्यावसायिक स्वतःच्या फायद्यासाठी करू शकतात. राज्याचे प्रधान सचिव विजयानंद यांनी हाऊसिंग कॉर्पोरेशनच्या वेबसाइटवरून होणा-या डेटा लीक प्रकरणात चौकशीचे आदेश दिले आहेत. राज्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही या गोष्टीची माहिती नाही. परंतु आधार डेटा बीडीपीवर उपस्थित आहे. विजयानंद यांच्या मते, राज्य सरकारनं गेल्या काही दिवसांपूर्वीच आंध्र प्रदेशमध्ये सायबर सिक्युरिटी ऑपरेशन्स सेंटरही सुरुवात करण्यात आली आहे. एका आठवड्यात सर्वकाही सुरळीत होणार असून, आम्ही पूर्णतः सावधानता बाळगली आहे.

# फ्लॅट बुकिंग: ३०० कोटींचा घोटाळा

**पुणे -** प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक डी. एस. कुलकर्णी यांनी पुणे शहरासह विविध ठिकाणी ११ गृहप्रकल्प कार्यान्वित करून, फ्लॅट धारकांना फ्लॅटचा ताबा लवकरच दिला जाईल, असे सांगून फ्लॅटचे ७० टक्के बुकिंग घेतले. याद्वारे त्यांनी एकूण ४७० कोटी रुपये जमा केले असून, त्यातील केवळ १७० कोटी रुपये फ्लॅट बांधकामासाठी खर्च केले, तर उर्वरित ३०० कोटी रुपयांच्या मौल्यवान दस्तावेजात फेरफार करून घोटाळा केल्याचा युक्तिवाद सरकार पक्षाचे विशेष सरकारी वकील प्रवीण चव्हाण यांनी गुरुवारी कोर्टात केला. विशेष न्यायाधीश जे. टी. उत्पात यांच्या कोर्टात ही सुनावणी सुरू आहे.

डीएसके यांच्या जामीन अर्जावर बचाव पक्षाकडून युक्तिवाद करण्यात आला आहे. गुरुवारी सरकारी पक्षाकडून युक्तीवाद करण्यात आला. डीएसके यांनी वेगवेगळ्या कंपन्या स्थापन करताना त्या पब्लिक प्रा. लि. नावाने उभारल्या असून, त्याद्वारे भागधारकांकडून पैशांची उभारणी केली. त्यामुळे डीएसके कंपन्यांचे खरे मालक नसून, ते केवळ विश्वस्त असल्याने त्यांनी कंपनी फायद्याच्या दृष्टीने निर्णय घेणे अपेक्षित होते.

मात्र, पदाचा गैरवापर करून त्यांनी भागधारकांचा पैसा वैयक्तिक कारणासाठी; तसेच स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी वापरला आहे. विविध कंपन्यांच्या माध्यमातून डीएसके यांनी सुमारे ३ हजार कोटी रुपयांचा घोटाळा केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अद्याप डीएसके यांच्या विरोधात कोल्हापूर, मुंबई येथे दाखल झालेल्या गुन्ह्यांचे एकत्रीकरण



न करण्यात आल्यामुळे त्यांना दुसऱ्या गुन्ह्यातही अटक होऊ शकते. डीएसके यांचे वकील श्रीकांत शिवदे यांनी न्यायालयात कलम ४३९ व १६७ नुसार, अर्ज दाखल करत पोलिसांनी ६० दिवसांत दोषारोपपत्र दाखल करून डीएसकेंना जामीन लवकर मिळावा, अशी मागणी केली. डीएसके यांच्यावर लावलेले जन्मठेपेचे कलम ४०९ ला विरोध केला. मात्र, सरकारी वकील चव्हाण यांनी यावर आक्षेप घेतला.

डीएसके यांच्यावर कलम ४०९ आणि ४६७ नुसार गुन्हा दाखल झाला असल्याने त्यात जन्मठेपची तरतूद आहे; तसेच या कलमांमुळे ९० दिवसांत दोषारोपपत्र दाखल करण्याची मुभा पोलिसांना असून, पुढील महिन्यात दोषारोपपत्र दाखल करण्यात येईल.



# एचडीएफसीकडून मुदत ठेवींवर जादा व्याज




नवी दिल्ली - खासगी क्षेत्रातील आघाडीच्या एचडीएफसी बँकेने मुदत ठेवींवरील व्याजदरांत वाढ केली आहे. या बँकेने एक कोटी रुपयांपर्यंतच्या मुदत ठेवींवर .०१ ते एक टक्क्यापर्यंत वाढ देऊ केली आहे. यामुळे एचडीएफसीच्या मुदत ठेवींवरील व्याजदराने स्टेट बँक तसेच अन्य अनेक बँकांच्या व्याजदरांना मागे टाकले आहे.

सुधारित व्याजदरानुसार एचडीएफसी बँकेत एक वर्षाच्या मुदत ठेवीवर ६.८५ तर एक वर्ष व १७ दिवस ते दोन वर्षांपर्यंतच्या मुदतीसाठी सात टक्के व्याज मिळेल. त्यापुढे पाच वर्षांपर्यंतच्या मुदतीसाठीही सात टक्के व्याज मिळेल. यापूर्वी या ठेवींवर सहा ते सव्वासहा टक्के व्याज मिळत होते.

बुडीत कर्जाच्या वाढत्या प्रमाणामुळे अडचणीत आलेली ॲक्सिस बँक प्रथमच तोट्यात गेली आहे. जानेवारी ते मार्च २०१८ या तिमाहीत या बँकेने दोन हजार १८८ कोटी रुपयांचा तोटा दर्शविला आहे. गेल्या वर्षी याच तिमाहीत या बँकेला बाराशे पंचवीस रुपयांचा नफा झाला होता. बुडीत व संशयित कर्जांसाठी सात हजार १७९ कोटी रुपयांची तरतूद केल्याने बँकेवर तोट्याची

# आसाराम टॉर्च मारून मुली निवडायचा!

**जोधपूर -** अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण केल्याचे पाप आपल्यासारख्या ब्रह्मज्ञानीला लागत नाही, अशी स्वयंघोषित अध्यात्मिक गुरू आसाराम बापू याची धारणा होती, अशी साक्ष फिर्यादी साक्षीदार आणि आसारामचा तत्कालीन अनुयायी राहुल सचर याने बुधवारी येथील न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान दिली. आपली लैंगिक क्षमता वाढवण्यासाठी आसाराम औषधे घेत असे तसेच तो अफूची नशाही करत असे, असेही सचर याने न्यायालयात शपथेवर सांगितले.

उत्तर प्रदेशमधील एका अल्पवयीन मुलीवर सुमारे पाच वर्षे बलात्कार केल्याच्या आरोपाखाली जोधपूरच्या विशेष न्यायालयाने बुधवारी आसाराम बापूला मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. या खटल्याच्या सुनावणीदरम्यान साक्षीदार राहुल सचर याने आसारामविषयीच्या अनेक बाबी न्यायालयासमोर उघड केल्या. राहुल आसारामच्या जवळच्या अनुयायांपैकी एक असल्याने त्याला आसारामच्या कुटीमध्ये थेट प्रवेश मिळत असे. सन २००३ मध्ये आपण आसारामला पुष्कर (राजस्थान), भिवनी (हरयाणा) व अहमदाबाद (गुजरात) येथील आश्रमांमध्ये मुलींचे लैंगिक शोषण करताना पाहिले. आश्रमात येणाऱ्या मुलींपैकी शोषणासाठी निवड करण्यासाठी आसाराम त्याच्यासोबत राहणाऱ्या तीन मुलींसोबत फेरफटका मारत असे. फेरफटका मारताना आसाराम एखाद्या मुलीवर टॉर्चचा प्रकाश टाकत असे. हा सिग्नल ओळखून त्याच्यासोबत राहणाऱ्या मुली त्या मुलीला आसारामच्या कुटीमध्ये घेऊन जात असत, अशी माहिती राहुलने न्यायालयात दिली. राहुलने आपल्या साक्षीत असे म्हटले आहे की, या विरोधात आपण आसारामला दोनवेळा लिहिलेल्या पत्राची त्याने दखल घेतली नाही. त्यामुळे आपण थेट कुटीमध्ये जाऊन त्याला जाब विचारला. तेव्हा आसाराम म्हणाला की, हे सर्व केले तरी ब्रह्मज्ञानीला पाप लागत नाही. त्यावर राहुलने



त्याला विचारले की, ब्रह्मज्ञानीच्या मनात अशाप्रकारची इच्छा कशी उत्पन्न होऊ शकते. हा प्रश्न ऐकताच निरुत्तर झालेल्या आसारामने त्याला आश्रमाबाहेर हाकलून लावले होते. राहुलने आसारामचा आश्रम सोडल्यानंतर २००४मध्ये त्याच्यावर हल्लादेखील करण्यात आला होता.

# पाथर्डीत बारमध्ये मद्यधुंद पोलिसाचा धिंगाणा

**अहमदनगर :** बीड जिल्ह्यातील एका पोलीस उपनिरीक्षकानं दारूच्या नशेत पाथर्डीतील एका बारमध्ये काल रात्री गोंधळ घातला. त्याला रोखण्यासाठी आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनाही त्यानं धक्काबुक्की केली. या प्रकरणी त्याला अटक करण्यात आली आहे.



अमोल मालुसरे असं या अधिकाऱ्याचं नाव आहे. बीड जिल्ह्यातील गेवराई पोलीस ठाण्यात मालुसरे कार्यरत आहे. तो पाथर्डीतील बारमध्ये गेला होता. तेथे जेवणाचे बिल साडेचार हजार रुपये झाले. बारमालकाने बिल मागितल्यानं दोघांमध्ये वाद सुरू झाला. मालुसरे याने रिव्हॉल्व्हर काढून धमकावण्यास सुरुवात केली. मालकासह नोकरांनाही मारहाण केली. याची माहिती मिळाल्यानंतर पाथर्डीचे पोलीस घटनास्थळी गेले. तेथे गेलेल्या अधिकाऱ्यालाही त्याने मारहाण केली. या प्रकरणी बारमालकानं पोलिसांत तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी मालुसरेला ताब्यात घेतले आहे.

# छत्तीसगडमध्ये चकमकीत ७ नक्षलवाद्यांचा खात्मा



छत्तीसगडमधील बिजापूर येथे नक्षलवादी आणि सुरक्षा दलांमध्ये झालेल्या चकमकीत सात नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले. गडचिरोलीत सुमारे ३७ नक्षलवाद्यांचा चकमकीत मृत्यू झाल्यानंतर बिजापूरमध्ये ही कारवाई झाल्याने नक्षली संघटनांना मोठा हादरा बसला आहे.

बिजापूर जिल्ह्यात शुक्रवारी सकाळी नक्षलवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाली. छत्तीसगड – तेलंगण सीमेवर ही चकमक झाली. घटनास्थळावरुन पोलिसांनी एक एसएलआर, रायफल, ६ रॉकेट लाँचर आणि तीन ग्रेनेड हस्तगत केले. चकमक अजूनही सुरु असल्याचे वृत्त काही प्रसारमाध्यमांनी दिले आहे.

गेल्या आठवड्यात शनिवारी रात्री महाराष्ट्र- छत्तीसगड सीमेवरील बोरिया गावालगत इंद्रावती नदीच्या विस्तीर्ण पात्रातील एका खडकाळ बेटावर नक्षलवादी आणि पोलिसांमध्ये चकमक झाली होती. या दोन चकमकींमध्ये एकूण ३७ नक्षलवादी ठार झाले. या कारवाईमुळे राज्यातील नक्षली चळवळीचे कंबरडेच मोडले. त्यापाठोपाठ छत्तीसगडमध्येही चकमक झाल्याने नक्षलवादी संघटनांना आणखी एक धक्का बसला आहे.

# ‘अभ्यासाचे नियोजन केल्यास यूपीएससीत यश’




**पुणे -** ‘स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना चोवीस तास अभ्यासाची गरज नाही. आठ ते दहा तास एकाग्र चित्ताने अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. परीक्षेचा अभ्यासक्रम प्रचंड मोठा असल्याने काय वाचावे, याचे नियोजन करावे लागते. त्यानुसार, स्वतःवर विश्वास ठेवून कष्ट घेतल्यास यश हमखास मिळते,’ अशी भावना पूजा राणावत हिने व्यक्त केली.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेत पूजाने देशभरात २५८ वा क्रमांक मिळविला आहे. लहानपणापासून पुण्यातच वाढलेल्या पूजाने सेंट ॲन्स शाळेत शिक्षण घेतले. फर्ग्युसन महाविद्यालयातून मानसशास्त्र विषयात पदवी घेतली. त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून राज्यशास्त्रात एमए केले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच स्पर्धा परीक्षा देण्याचे ध्येय पूजाने निश्चित केले होते. त्याबद्दल सांगताना ती म्हणाली, ‘माझ्या कुटुंबाची पार्श्वभूमी व्यवसायाची आहे. मात्र, मी सरकारी सेवेत कारकीर्द करण्याचे ध्येय ठेवले होते. त्याला वडिलांनी पूर्णपणे पाठिंबा दिला. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. चाणक्य मंडल परिवाराच्या अविनाश धर्माधिकारी सरांचे मार्गदर्शनही घेतले. घेतलेल्या कष्टाचे अखेर चीज झाले.’

# अहमदनगर पुन्हा हादरले

## जामखेडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन कार्यकर्त्यांची गोळ्या झाडून हत्या

शिवसेना कार्यकर्त्यांच्या हत्याकांडाचे प्रकरण ताजे असतानाच आता जामखेडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन कार्यकर्त्यांची हत्या करण्यात आल्याने नगर जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. अज्ञात व्यक्तीने केलेल्या गोळीबारात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष योगेश अंबादास राळेभात (वय ३०) आणि राकेश उर्फ रॉकी अर्जुन राळेभात यांचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी (दि.२८ एप्रिल) सांयकाळी सव्वा सहाच्या दरम्यान बीड रस्त्यावरील वामन ट्रेडर्ससमोर घडली. नगरमध्ये एका महिन्यात दुसऱ्यांदा गोळीबाराची घटना घडल्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दरम्यान, हत्येच्या निषेधार्थ आज जामखेडमध्ये बंद पुकारण्यात आला आहे.

अधिक माहिती अशी, योगेश व राकेश राळेभात हे वामन ट्रेडर्ससमोर बोलत होते. त्याचदरम्यान सांयकाळी सव्वा सहाच्या सुमारास दोन दुचाकीवरून आलेल्या आणि तोंडाला रूमाल बांधलेल्या तीन अज्ञात व्यक्तींनी गावठी कट्ट्यातून योगेश व राकेश यांच्यावर आठ गोळ्या झाडल्या. त्यानंतर हल्लेखोरांनी तेथून पलायन केले. त्यावेळी तिथे उपस्थित असलेल्या



ग्रामस्थांनी दोघांना ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेले. परंतु वैद्यकीय अधिकारी उपस्थित नसल्यामुळे योगेश व राकेश उपचाराअभावी अर्धा तास तसेच पडून होते. वैद्यकीय अधीक्षक सी. व्ही. लामतुरे आल्यानंतर प्राथमिक उपचार करून जखमींना नगरच्या खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, तोपर्यंत उशीर झाला होता. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# वेगाने येणाऱ्या व्हॅनची ट्रकला टक्कर

## १२ जण ठार, ४ जखमी



येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २४ वर उभ्या असलेल्या ट्रकला शनिवारी सकाळी वेगाने येणाऱ्या व्हॅनने धडक दिल्याने झालेल्या अपघातात १२ जण ठार झाले असून चार जण जखमी झाले आहेत, असे पोलिसांनी सांगितले.

शाहजहानपूर येथून १६ जणांना घेऊन सीतापूर येथे निघालेल्या व्हॅनने उचौलिया येथे उभ्या असलेल्या एका ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली, त्यामध्ये व्हॅनचालक अनुप अवस्थी (२५) आणि त्याचा मदतनीस किशन (२३) यांच्यासह नऊ जण जागीच ठार झाले, असे पोलीस अधीक्षक ए. चन्नाप्पा यांनी सांगितले. या अपघातात जखमी झालेल्या सात जणांना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र त्यापैकी तीन जण मरण पावले. तर तीन महिन्यांचे मूल आणि एक वर्षाचा मुलगा असे दोन जण आश्चर्यकारकपणे बचावले, असे पोलीस उपअधीक्षक विजय आनंद यांनी सांगितले. व्हॅनचालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने हा अपघात घडल्याचे आनंद यांनी सांगितले. अन्य मृतांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे, असेही ते म्हणाले.

# भांडूपमध्ये शौचालय कोसळून २ ठार

**मुंबईः भांडूपच्या शिवाजी तलावजवळील साईसदन चाळीत सार्वजनिक शौचालय खचून झालेल्या दुर्घटनेत दोन जण ठार झाले आहेत. या दुर्घटनेत आणखी दोन जण अडकल्याची भीती असून अग्निशमन दलाकडून शोध मोहीम सुरू आहे.**

शनिवारी पहाटे साडेसहा वाजता ही दुर्घटना घडली. भांडुपमध्ये टँक रोड परिसरात असलेल्या पाटीलवाडीतलं सार्वजनिक शौचालय खचलं आणि या शौचालयांचा पूर्ण ढाचा जमिनदोस्त झाला. ज्या ठिकाणी हे शौचालय होतं तिथे मोठा खड्डा पडला आहे. ढिगाऱ्याखाली २ महिला आणि २ पुरुष अडकल्याने अग्निशमन दल आणि पोलिसांना तात्काळ घटनास्थळी पाचारण करण्यात आलं. अग्निशमन दलाने मदतकार्यास सुरुवात करून दोन जणांचे मृतदेह ढिगाऱ्याखालून काढले आहेत. मृतांमध्ये एक महिला आणि पुरुषाचा समावेश असून बाबूलाल देवाशी, लाबूबेन जेठवा अशी त्यांची नावं आहेत. इतर दोन जणांचा अजूनही शोध घेण्यात येत आहे. दरम्यान, एनडीआरएफचं एक पथक आणि पालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारीही घटनास्थळी पोहोचले होते.






हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)